| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHKO050053282024 | दाखल दिनांक | :- | १३/०९/२०२४. | | |
| | नोंदणी दिनांक | :- | २३/०९/२०२४. | | |
| | निकाल दिनांक | :- | ०९/०७/२०२६. | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | :- | ०१ | ०९ | २६ |

**इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी आर. डी. खराटे.)
न्यायनिर्णय अधिघोषित दि.०९ जुलै, २०२६.

**नियमित फौजदारी खटला क्र.४२५/२०२४.** **नि.क्र.१८.**

शहापूर पोलिस ठाणे, इचलकरंजी, गुन्हा नोंद क्र.९८/२०२४, भा.दं.वि.सं. कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| वर्दीदार | | महाराष्ट्र शासन मार्फत शहापूर पोलिस ठाणे, इचलकरंजी. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.पी.शेटे. |
| आरोपी | | **१. अशोकराज श्रीपती नलवडे,**<br>व.व.५४, व्यवसाय – व्यापार,<br>रा.चौंडेश्वरी कॉलनी, शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.<br>**२. रोहन अशोक नलवडे,**<br>व.व.२९, व्यवसाय – सॉफ्टवेअर इंजिनिअर,<br>रा.चौंडेश्वरी कॉलनी, शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. |
| आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ | | श्री.आर.व्ही.काटकर. |

**भाग-ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १६/०३/२०२४. |
| वर्दी दाखल दिनांक | १७/०३/२०२४. |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | २८/०८/२०२४. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | २८/०४/२०२६. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०७/२०२६. |
| पुरावा संपल्याचा दिनांक | ०४/०७/२०२६. |
| फौ.प्र.सं.कलम ३१३ चे निवेदन नोंदविल्याचा दिनांक | नोंदविले नाही. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | - |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक. निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अशोकराज श्रीपती नलवडे. | - | - | भा.दं.वि.सं. कलम ३२४, ५०४ व ५०६ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | रोहन अशोक नलवडे. | - | - | भा.दं.वि.सं. कलम ३२४, ५०४ व ५०६ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग-क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षिदार/बचाव पक्षातर्फे साक्षिदार/न्यायालयीन साक्षिदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निखिल नंदकुमार होगाडे | फिर्यादी | १५ |

**ब. बचाव पक्ष**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | काही नाही. | - | - |

**क. न्यायालयाने तपासलेले साक्षिदार**

| सा.क्र. | साक्षिदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | काही नाही. | - | - |

**ड. भिस्त ठेवलेले न्यायनिर्णय**

| |
|---|
| **काही नाही.** |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १४ | फिर्यादी व आरोपींतर्फे तडजोड अर्ज. |
| २. | १६ | फिर्यादीवरील सही. |
| ३. | १७ | फिर्यादी व आरोपीतर्फे पुरावा बंद व तडजोड पुरसिस. |

**-न्या य नि र्ण य-**

( दि.०९ जुलै, २०२६ रोजी अधिघोषित.)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की**,

२. दि.१६/०३/२०२४ रोजी १३.०० वाजण्याच्या सुमारास शहापूर गांवातील चौंडेश्वरी कॉलनीमधील आरोपी क्र.१ यांच्या घरासमोरील रस्त्यावर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे सदरची घटना घडली. वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीच्या घरासमोर गटार बांधण्याचे काम सुरु होते. त्यावेळी तेथील कामगार योगेश याने फोडाफोडीचे काम करण्यासाठी फिर्यादीच्या घरातून ब्रेकर मशीन आणले. त्यानंतर फिर्यादी यांनी काम चालू असलेल्या ठिकाणी जाऊन योगेश यास 'तू कोणास विचारुन ब्रेकर मशीन आणलेस' असे म्हणाले असता आरोपी क्र.१ ने फिर्यादीस शिवीगाळ करुन काठीने त्यांच्या उजव्या पायावर मारहाण केली. त्यानंतर त्यादिवशी रात्री पुन्हा आरोपी क्र.२ ने फिर्यादी व तेजस कडोलकर यांना 'तुम्हाला दोन दिवसांत बघून घेतो' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द शहापूर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली.

३. सदर फिर्यादीवरुन गु.र.क्र.९८/२०२४ हा भा.द.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदवण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहाय्यक फौजदार श्री.जे.ए.शिंदे यांनी केला. त्यांनी तपासामध्ये घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षिदारांचे तपासटिपण नोंदवले, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. दि.२८/०४/२०२६ रोजी आरोपींविरुध्द भा.द.वि.कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप **नि.क्र.९** नोंदवून तो त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपींविरुध्द सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. फिर्यादी पक्षाचा पुरावा व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, दि.१६/०३/२०२४ रोजी १३.०० वाजण्याच्या सुमारास शहापूर गांवातील चौंडेश्वरी कॉलनीमधील आरोपी क्र.१ यांच्या घरासमोरील रस्त्यावर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे आरोपी क्र.१ यांनी आरोपी क्र.२ यांच्या समान उद्देशाच्या पुर्न:सारनार्थ फिर्यादीस काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ यांनी आरोपी क्र.२ यांच्या समान उद्देशाच्या पुर्न:सारनार्थ फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याच्याकडून सार्वजनिक शांतता भंग होईल असे त्यांना प्रक्षोभित केले ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्षाने सिध्द केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ व २ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्न:सारनार्थ फिर्यादी व तेजस कडोलकर यांना जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकटपटशा केला ? | **नकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ साठी</u> -**

मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची चर्चा एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

६. सदर प्रकरण हे प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षिदाराच्या पुराव्यावर अवलंबून असून अभियोगपक्षाची मदार प्रामुख्याने (सा.क्र.१) फिर्यादी निखिल नंदकुमार होगाडे यांच्या पुराव्यावर आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाल्यामुळे त्यांनी गैरसमजुतीमधून आरोपींविरुध्द फिर्याद दिली. त्यांना फिर्यादीतील मजकूर माहिती नाही. सदर साक्षिदाराने अभियोगपक्षास मदत न केल्यामुळे विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादीस उत्तर सुचक प्रश्न विचारले परंतु त्यांनी स्पष्टपणे नकारात्मक स्वरुपाची उत्तरे दिली.

७. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील सर्वात महत्वाचे व प्रत्यक्षदर्शी साक्षिदार म्हणजेच फिर्यादी यांनी अभियोगपक्षाच्या कथनांना दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे फिर्याद सिध्द होऊ शकली नसल्याने अभियोगपक्षाच्या मुळ गाभ्याचा घात झाला आहे. त्यामुळे मुळातच गुन्ह्याचे मुलतत्व शाबीत होऊ शकलेले नाही. फौजदारी खटल्यामध्ये अभियोगपक्षाने आपला खटला संशयापलीकडे सिध्द करणे आवश्यक असते व तसे करण्यास अभियोगपक्ष या खटल्यामध्ये असमर्थ ठरलेला आहे. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याबाबत कथन करुन तसे तडजोड पत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे फिर्यादीने दाखल

केलेल्या फिर्यादीचे अवलोकन करता घटनेच्यावेळेस आरोपींनी फिर्यादी यांना काठीने मारहाण केली, शिवीगाळ केली व फिर्यादी व तेजस कडोलकर यांना जीवे मारण्याची धमकी दिली या बाबी निःसंशय सिध्द होऊ शकल्या नाहीत. याव्यतिरिक्त येथे नमूद करणे गरजेचे आहे की, फिर्यादी व आरोपी यांनी **नि.क्र.१४** वर प्रकरण तडजोड करण्यासाठी अर्ज दाखल करुन फिर्यादी यांनी **नि.क्र.१७** वर पुरावा बंद व सदरची केस चालवायची नसल्याबाबत पुरसिस दाखल केली आहे. त्यामुळे आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकलेले नाहीत. सदर खटला जरी **फौ.प्र.सं.चे कलम ३२०** प्रमाणे तडजोडीस पात्र नसला तरी एकदंरीत खटल्याचे स्वरुप व उभय पक्षांमधील संबंध पाहता सामाजीक ऐक्य राहण्याचे दृष्टीने अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षिदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे एकंदरीत साक्षीपुराव्याचा विचार करताना आरोपींविरुध्द दोष ठेवण्याइतपत पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे **मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> -**

८. वरील सर्व विवेचनांवरुन मी या निष्कर्षावर आले आहे की, अभियोगपक्ष आरोपींचा गुन्हा नि:संशय सिध्द करण्यास असमर्थ ठरले आहे. सबब, आरोपी हे संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. त्याकरीता आरोपी यांना भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचीत होईल. सबब, मी मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल पुढील आदेश पारीत करीत आहे:-

## <u>आदेश</u>

१. **आरोपी क्र.१ अशोकराज श्रीपती नलवडे व आरोपी क्र.२ रोहन अशोक नलवडे** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणेच्या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता केली आहे.

२. आरोपी क्र.१ व २ यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चा जामीन कदबा या न्यायालयात सादर करावा.

**४.** सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल मु.र.क्र.२०६/२०२४ लाकडी काठी ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

REENA DEEPAK KHARATE

Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2026.07.09 17:24:37 +0530

दि.०९/०७/२०२६.

**(आर. डी. खराटे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी.